# देगलूरमध्ये 'करिअर कट्टा'चे उद्घाटन

देगलूर, ता. ३० (बातमीदार) : राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने देगलूर महाविद्यालयात ऑनलाइन माझा कटा या उपक्रमाचे उद्घाटन झाले. अलिकडचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग असून मोबाईलच्या माध्यमातून आयएएस आपल्या भेटीला व उद्योजक आपल्या भेटीला हा विद्यार्थी वर्गास उपयुक्त उपक्रम देगलूर महाविद्यालयामध्ये सुरू करण्यात आला आहे.



देगलूर : देगलूर महाविद्यालयात 'करिअर कट्टा'चे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थी वर्गास केवळ ३६५ रुपयांमध्ये एक वर्ष ऑनलाइन पद्धतीने आयएएस प्रशासकीय अधिकारी व विषय तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. यासाठी नाव नोंदणीसाठी तसेच यु ट्यूबवर ऑनलाइन तासिका सुरू करण्यात आल्या आहेत. याची माहिती असलेल्या फलकाचे अनावरण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी चिद्रावार यांच्या हस्ते झाले. विद्यार्थी वर्गाने या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. चिद्रावार यांनी केले. स्पर्धात्मक परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी हा उपक्रम दिशादर्शक ठरेल, असे मत समन्वयक डॉ. संजय देबडे यांनी नोंदवले. प्रास्ताविक समन्वयक डॉ. देबडे यांनी केले. ''उद्योजक आपल्या भेटीला'' या उपक्रमाचे समन्वयक डॉ. सुरेश काशिंदे यांनी आभार मानले. यावेळी लोकप्रशासन विभागप्रमुख डॉ. बी. आर. कतुरवार , प्रा. ए. आर. डांगे. डॉ. व्यंकट खंदकुरे व ग्रंथपाल साईनाथ शिंदे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.